## ताण..........???

ताणल्या वर ताणते म्हणून,
उगा अती ताणू नये,
तुटल्यावर तुटण्याची,
कारणे सांगू नये.----------१
तुटल्यावर तुटल्याचे
दुःख, फक्त बघू नये,
ताण, तुटण्या आधीचे,
जाणल्या शिवाय राहू नये.------२
तुटणारा तुटतो क्षणात,
असे कधी समजू नये,
ताणाताणात तुटत जातो,
सल त्याची,विसरू नये.-----------३
ताण सहतो कुणी म्हणून,
अंत त्याचा पाहू नये,
अंतच होइल अंतातीत,
समजून असे खेळू नये.---------४

**डॉ.विनोद अडबे.**